नॅक द्वारा 'अ' श्रेणी प्राप्त

# जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र
# राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिकी एवं सूचना प्रौद्योगिकी संस्थान
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

## मेगा जॉब फेअर 2017 चे आयोजन

विद्यापीठातील ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तसेच राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिकी एवं सूचना प्रौद्योगिकी संस्थान (NIELIT) यांच्या संयुक्त विद्यमाने “मेगा जॉब फेअर 2017” चे आयोजन दि. 10 ऑगस्ट 2017 रोजी विद्यापीठातील मुख्य सभागृह (ऑडिटोरिअम) येथे करण्यात आले होते.

औरंगाबाद, पुणे, मुंबई येथील नामांकित कंपन्या या जॉब फेअर मध्ये सहभागी झाल्या होत्या. विविध पदविका, पदवी तसेच पद्व्योत्तर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता या जॉब फेअर मध्ये नौकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. प्रामुख्याने औरंगाबाद येथील रुचा इन्जिनिअरिंग, एन.आर.बी. बेरिंग, हेडगेवार रुग्णालय, व्यापारी महासंघ, आय.सी.आय.सी.आय प्रुडेन्शिअल, डेटा कॅटलिस्ट, शोध  तसेच इतरही काही कंपन्यांनी सहभाग घेतला. एकूण १८ कंपन्यांनी या जोब फेअर मध्ये सहभाग नोंदवला. एकूण १८६० विद्यार्थ्यांनी इंटरव्यू साठी आपली उपस्थिती नोंदवली त्यापैकी सुमारे ५१० विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड करण्यात आली.

या मेगा जोब फेअर साठी विद्यापीठाचे ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी डॉ. गिरीश काळे, जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाचे सहाय्यक संचालक श्री. निशांत सूर्यवंशी, श्री. विजय रिसे, श्री. सुरेश शेळके, राष्ट्रीय करिअर सर्विसचे डॉ. अनिल जाधव यांनी परिश्रम घेतले.